# आकाशवाणी पुणे
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 08.06.2023** **वार – गुरुवार**

---

**पालखी**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींच्या पालखी सोहोळा प्रस्थानाच्या पार्श्वभूमीवर आळंदीत वारकरी दिंड्यांची वाहने सोडून अन्य अवजड वाहनांच्या वाहतुकीला बंदी घालण्यात आली आहे. त्याचबरोबर आळंदीच्या प्रवेशद्वारावर पोलिसांची तपासणी नाके उभारण्यात आले आहेत. येत्या 12 तारखेपर्यंत हे निर्बंध कायम राहणार आहेत. येत्या रविवारी माउलींच्या पालखी सोहोळ्याचे प्रस्थान होणार असून त्या दिवशी रात्रीचा मुक्काम समाधी मंदिराशेजारील आजोळघरीच राहणार आहे. सोमवारी सायंकाळपर्यंत पुण्यनगरीत दाखल होणार आहे. दरम्यान राज्यातून तसंच राज्याबाहेरुनही मोठ्या संख्येनं वारकरी भाविक अलंकापुरीमध्ये दाखल होऊ लागले असून इंद्रायणीचा काठ विठू माऊलीच्या गजराने दुमदुमून गेला आहे.

**आरोग्य**

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत बारामती लोकसभा मतदार संघातील बारामती आणि दौंड तालुक्यांत प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच कर्मचारी निवासस्थानांसाठी एकंदर 12 कोटी 63 लाख रुपये मंजूर झाले आहेत. खासदार सुप्रिया सुळे यांनी ही माहिती दिली आहे. बारामती तालुक्यातील डोर्लेवाडी इथं प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी 2 कोटी 76 लाख रुपये , सांगवी इथल्या प्राथमिक आरोग्य केंद्र कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानासाठी 3 कोटी 65 लाख रुपये तर दौंड तालुक्यातील रावणगाव इथं प्राथमिक आरोग्य केंद्राची मुख्य इमारत आणि कर्मचारी निवासस्थान बांधकामासाठी 6 कोटी 22 लाख रुपये मंजूर झाले आहेत.

**तपासणी**

राज्याच्या “जागरुक पालक, सुदृढ बालक’ तपासणी कार्यक्रमांतर्गत पुणे महापालिकेने शहरातील खाजगी, सरकारी शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमधील लक्ष्य गटातील 6 लाख 79 हजारपैकी 4 लाख 65 हजार विद्यार्थ्यांची तपासणी केली आहे. गेल्या 9 फेब्रुवारीपासून हा कार्यक्रम सुरू आहे. राज्य आरोग्य विभागाच्या कार्यक्रमाअंतर्गत मुलांमध्ये अशा प्रकारची तपासणी प्रथमच करण्यात आली आहे. गंभीर आजार असणाऱ्या, शस्त्रक्रियेची गरज असणाऱ्या मुलांना तत्काळ आरोग्यसेवाकेंद्रात

उपचार सुरू केले असल्याचं पुणे महापालिका सहायक आरोग्य अधिकारी डॉ. वैशाली जाधव यांनी सांगितलं आहे.

**रक्तपेढी**

पुण्यात गेल्या अनेक वर्षांपासून जिल्हा रुग्णालयामधील मेट्रो रक्तपेढी प्रलंबित होती. मात्र आता ही मेट्रो रक्तपेढी सुरू करण्याच्या सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्या आहेत. ही रक्तपेढी सुरू करण्यासाठीची परवानगी मिळाल्यानं पुढील महिन्यात रक्तपेढी सुरू होणार असल्याचे प्रशासनाने सांगितलं आहे. मेट्रो रक्तपेढीमुळे रक्त घटकांवर विविध प्रक्रिया करणं तसच रक्तसंकलनाची क्षमता वाढणार असल्याची माहिती औंध जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक नागनाथ यम्पल्ले यांनी दिली आहे.

**रुग्णवाहिका**

रुग्णवाहिका चालकांनी पालखी काळात बहिष्कार टाकू नये ; अनुदान येत नाही तोपर्यंत कंत्राटराला वेतन देण्यासाठी सांगण्यात आले असून पालखी सोहळ्यात बहिष्कार न टाकता माउलीची सेवा करावी असे आवाहन पुणे जिल्हा परिषदेचे आरोग्य आधिकारी डॉ. रामचंद्र हंकारे यांनी केले आहे . रुग्णवाहिका चालकांचे वेतन राज्य स्तरावरून होत असल्याने त्यासाठी पाठपुरावा सुरू असल्याचं हंकारे यांनी म्हटलं आहे.

**समाज विकास**

पुणे महापालिकेतील समाज विकास विभागातील मानधन तत्वावर काम करणाऱ्या सेवकांना महापालिका सेवेत कायम करून घेण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी कोणताही निधी राज्य सरकारकडून दिला जाणार नाही, यासह विविध अटी-शर्तींसह ही मान्यता देण्यात आली आहे. हे कर्मचारी शासकीय आदेशाच्या दिनांकापासून महापालिकेच्या सेवेत कायम होणार आहेत. यासंदर्भातील शासकीय आदेश नुकताच काढण्यात आला आहे. माजी आमदार मेधा कुलकर्णी यांनी यासाठी पाठपुरावा केला होता.

**व्हेंडिंग**

पुणे महापालिकेने मंडईसह आठ ठिकाणी यंत्राच्या माध्यमातून पिशव्या उपलब्ध करून देण्याची सुविधा सुरू केली आहे. यंत्रामध्ये दहा रुपयांचे नाणे टाकल्यानंतर ग्राहकाला पिशवी मिळणार आहे. त्यातून महिला बचत गटांना एक उत्पन्नाचे साधनही उपलब्ध होणार आहे. पुणे महापालिका आणि झेन्सार कंपनीच्या आर पी जी फाउंडेशनच्या माध्यमातून हा उपक्रम राबविला जात आहे. मंडई, तुळशीबाग, हडपसर येथील मंडई, मार्केटयार्ड येथील मंडई, आदी ठिकाणी हे यंत्र बसवण्यात आलं आहे. तसेच लक्ष्मी रस्ता इथंही हे यंत्र बसविले जाणार आहे.

**अकरावी ऑनलाईन प्रवेश**
पुण्यात इयत्ता अकरावीच्या मध्यवर्ती ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेअंतर्गत आजपासून विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जाचा दुसरा भाग भरण्यास सुरुवात झाली असून तो 12 जूनपर्यंत भरता येणार आहे. यात विद्यार्थ्यांना महाविद्यालयांचे किमान एक आणि जास्तीत जास्त १० पसंतीक्रम द्यावे लागणार आहेत. यादरम्यान विद्यार्थ्यांना अर्जाचा पहिला भागही भरता येणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी आपल्या अर्जाचा भाग एक भरलेला आहे आणि त्यांची पडताळणी झालेली आहे. अशा विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर केली जाईल.

**हवामान**
पुणे आणि परिसरात आज अंशतः ढगाळ हवामान होतं. कमाल तापमान 37 पूर्णांक 5 तर किमान तापमान 23 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही याचप्रमाणे हवामान राहण्याची शक्यता असून हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणेकेंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**